Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ५, अंक ३८]   गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर २८-डिसेंबर ४, २०१९/अग्रहायण ७-१३, शके १९४१   [पृष्ठे ९, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ-नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २११.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.—**

क्रमांक डि.टि.पी.-प्रारूप नगर रचना परियोजना पारडी, भरतवाडा, पुनापूर, भांडेवाडी टिपीएस-१ नागपूर-आगाऊ ताबा-कलम ८३(२)-टिपीव्ही-२-५५०२-२०१९.—

ज्याअर्थी, पारडी, भरतवाडा, पुनापूर, भांडेवाडी येथील प्रारूप नगर रचना परियोजना क्र. १ (यापुढे " उक्त प्रारूप योजना " असे संबोधलेली आहे.) नागपूर सुधार प्रन्यासने (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे उल्लेखिलेली आहे.) दि. ०६ जुलै २०१८ रोजी शासनास मंजुरीसाठी सादर केलेली असून उक्त प्रारूप योजना शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधलेली आहे.) चे कलम ६८(२) अन्वये अधिसूचना क्र. टिपीएस-२४१८, शिकाना-९-प्र.क्र.२८१-२०१८-नवि-९, दि. ६ ऑक्टोबर २०१८ रोजी मंजूर केली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ७२, उप-कलम १ अन्वये आणि महाराष्ट्र नगर रचना योजना नियम, १९७४ मधील नियम क्र. ११ नुसार अधिसूचना क्र.टिपीएस-२४१८, शिकाना-९-प्र.क्र.२८१-२०१८-नवि-९, दि. १५ नोव्हेंबर २०१८ रोजी सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांची उक्त प्रारूप योजनेसाठी लवाद म्हणून नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नगर रचना योजना क्र. १ तयार करण्यासाठी उक्त नियोजन प्राधिकरणाने ठराव क्र. १/११६९, दि. २० मे २०१७ अन्वये आयुक्त, नागपूर महानगरपालिका व नागपूर स्मार्ट अॅन्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन, लिमिटेड या विशेष उद्देश वाहनास प्राधिकृत केले आहे (यापुढे " उक्त विशेष उद्देश वाहन " असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रारूप योजनेमध्ये वेगवेगळे अंतिम भूखंडक (इमारत विरहित) ईडब्लूएस हौसिंगसाठी आ.क्र. ३२३, ३२७, ३९६ व ३८२ अन्वये आरक्षित केले असून त्यावरील तात्काळ कामकाज हाती घेण्याच्या दृष्टीने उक्त प्रारूप योजनेतील ईडब्लूएस हौसिंगसाठी आरक्षित जागेचा



ना.-एक-अ-१ (१७०६).

आगाऊ ताबा घेण्याबाबत उक्त विशेष उद्देश वाहनाने केलेल्या विनंतीनुसार उक्त नियोजन प्राधिकरणाने ठराव क्र. १२-११८३-२६ नोव्हेंबर २०१८-एसई-प्लॅनिंग, दि. २६ नोव्हेंबर २०१८ रोजी ठराव केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने दि. ५ जानेवारी २०१९ रोजीच्या पत्राद्वारे उक्त प्रारूप योजनेसाठीचे लवाद, यांना उक्त अधिनियमाचे कलम ८३, उप-कलम (१) अन्वये ईडब्लूएस हौसिंगसाठी आरक्षित असलेल्या जागेच्या आगाऊ ताबा घेण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यास कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, लवाद यांनी आगाऊ ताबा घेण्याच्या प्रस्तावासोबत आरक्षणाने बाधीत नागरिकांना सुनावणी देऊन त्यासंबंधीचा अहवाल उक्त अधिनियमाचे कलम ८३, उप-कलम (२) अन्वये दि. २३ जुलै २०१९ रोजी शासनाकडे सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाचा निर्णय क. टिपीएस-१८१३/३२११/प्र.क्र.५०८-नवि-१३, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये सर्व नियोजन प्राधिकरणे आणि जिल्हा परिषद नियोजन प्राधिकरण यांच्याबाबत, उक्त अधिनियमाचे कलम ८३(२) अन्वये आगाऊ ताबा अनुषंगाने कार्यवाही करण्याचे अधिकार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत. यास अनुसरुन वरीलप्रमाणेचा आगाऊ ताबा घेण्याचा प्रस्ताव शासनाने दि. ६ ऑगस्ट २०१९ रोजीच्या पत्राद्वारे संचालनालयाकडे पाठविलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, लवाद यांनी त्यांच्या दि. २३ जुलै २०१९ रोजीच्या अहवालात आ.क्र. ३२३, ईडब्लूएस हौसिंग या आरक्षणाखालील जागेच्या जमिनधारकांनी सदर आरक्षण त्यांच्याच कुटुंबियांच्या नजिक असलेल्या जागेवर स्थानांतरित करण्याची विनंती लवाद यांच्याकडे केल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार लवाद यांनी हरकत नसल्याचे कळविले आहे आणि आरक्षण क्र. ३२७, ३९६ व ३८२ या आरक्षणामुळे गुंठेवारी नियमानुकुल भूखंडके असल्याने कार्यवाही करणे उचित होणार नाही, असे कळविले आहे ;

आणि ज्याअर्थी, नागपूर शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेमध्ये उक्त प्रारूप योजनेखलील जागा रहिवास, औद्योगिक, वाणिज्य, ना-विकास क्षेत्र तसेच आरक्षणामध्ये अंतर्भूत असल्यामुळे उक्त नियोजन प्राधिकरणाने वरील वापर विभाग व आरक्षणे वगळून जागा उक्त प्रारूप योजनेमध्ये समाविष्ट करण्याचे ठरवून त्याअनुषंगाने उक्त अधिनियमाचे कलम ३७, उप-कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी शासनास सादर केला आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने वरील प्रस्तावित फेरबदलास उक्त अधिनियमाचे कलम ३७, उप-कलम (२) अन्वये अधिसूचना क्र. टिपीएस-२४१८-१७०४-प्र.क्र.२९३-२०१८-नवि-९, दि. १४ नोव्हेंबर २०१८ अन्वये पुढीलप्रमाणे व खालील अटीस अधीन राहून मान्यता दिली आहे.—

> " नागपूर सुधार प्रन्यासच्या ग्रिन बेल्ट कंट्रोल स्किममधील मौजा पारडी, भरतवाडा, पुनापूर व भांडेवाडी येथे केंद्र शासन पुरस्कृत स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत समाविष्ट केलेले १७३० एकर (७००.४०४ हेक्टर) क्षेत्र मंजूर विकास योजनेतील प्रस्तावित आरक्षण व वापर विभागामधून वगळून प्रारूप नगर रचना परियोजना क्र. १ मधील नकाशात दर्शविल्यानुसार वापर विभागामध्ये खालील अटीस अधिन राहून समाविष्ट करण्यात येत आहे."

**अट**-शासनाने कलम ६८(२) अन्वये मंजुरी दिल्यानुसार उक्त नगर रचना परियोजना क्र. १ मधील मौजा पारडी, भरतवाडा, पुनापूर व भांडेवाडी येथील जमिनीवरील प्रस्ताव मंजूर विकास योजनेचा भाग राहतील ;

आणि ज्याअर्थी, शासनाने अधिसूचना क्र. टिपीएस २४१९-१४१९-सी.आर. १५४-२०१९-नवि-९, दि. २७ ऑगस्ट २०१८ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या सात योजनांसह संपूर्ण क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरणाचे अधिकार वापरण्यास नागपूर महानगरपालिकेस परवानगी दिलेली असून, नागपूर सुधार प्रन्यासला असलेले नियोजन प्राधिकरणाचे अधिकार संपुष्टात आणले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या दि. १४ नोव्हेंबर २०१८ च्या अधिसूचनेनुसार उक्त प्रारूप योजनेमधील प्रस्ताव हे मंजूर विकास योजनेचे भाग झाले आहेत. त्यामुळे मंजूर विकास नियमावलीमधील नियम क्र. १३.५ नुसार प्राधिकरण आरक्षणाच्या स्थानामध्ये बदल करू शकते. तसेच, शासनाच्या दि. २७ ऑगस्ट २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार उक्त प्रारूप योजनेसाठी नागपूर महानगरपालिका हे नियोजन प्राधिकरण होत आहे. यास अनुसरून आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी नियम क्र. १३.५ मधील तरतूद विचारात घेऊन त्यांचेकडील आदेश क्र. ५५६, दि. २५ सप्टेंबर २०१९ अन्वये आ. क्र ३२३, ईडब्लूएस हौसिंग, क्षेत्र २७,५२३.० चौ. मी. हे आरक्षण उक्त प्रारूप योजनेतील अंतिम भूखंड क्र. ३२३ मधून अंतिम भूखंड क्र. ६६/१ व ६६/२ मध्ये स्थानांतरित केले आहे ;

आणि ज्याअर्थी, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१९ रोजीचे पत्राद्वारे वरील आदेशाची प्रत भाग नकाशाच्या प्रतीसह संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांना सादर केले आहे. सबब, सि.स.नं. १४८, मूळ भूखंड क्र. ६६ अंतिम भूखंड क्र. ६६/१ व ६६/२ यामधील आ. क्र. ३२३, ईडब्लूएस हौसिंग, क्षेत्र २७,५२३.० चौ. मी. (यापुढे " उक्त जागा " असे उल्लेखिलेले आहे.) हे आरक्षण आता उक्त प्रारूप योजनेतील प्रस्ताव ठरत असल्यामुळे उक्त अधिनियमाचे कलम ८३, उप-कलम (१) अन्वये आगाऊ ताबा घेण्यासाठी विचारार्थ घेता येईल ;

आणि ज्याअर्थी, लवाद यांचा अहवाल विचारात घेता, उक्त प्रारूप योजनेतील उक्त जागेवर सार्वजनिक हितार्थ काम सुरू करण्याच्या दृष्टिने नागपूर महानगरपालिका या नियोजन प्राधिकरणास आगाऊ ताबा तातडीने आवश्यक असल्याबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य यांची खात्री झाली आहे,

त्याअर्थी, आता, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य हे प्राप्त अधिकारात, उक्त अधिनियमाचे कलम ८३, उप-कलम (२) अन्वये खालील, अनुसूचीमध्ये नमूद जागेचा आगाऊ ताबा घेण्याबाबत व त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात लवाद यांना आदेशित करत आहेत.

**अनुसूची**

| अनु. क्र. | सि.स.नं. | मूळ भूखंद क्र. | अंतिम भूखंड क्र. | आ.क्र. ३२३, ईडब्लूएस हौसिंग या आरक्षणासाठी आगाऊ ताबा घ्यावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | १४८ | ६६ | ६६/1 (भाग) व ६६/२ | २७,५२३०.० चौ. मी. |

**टीप :—** उक्त जागा दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कार्यालयीन कामाच्या सर्व दिवशी उपलब्ध राहील.

(१) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

(२) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.

(३) लवाद, नगर रचना परियोजना क्र. १, नागपूर.

सदर अधिसूचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर **www.dtp.maharashtra.gov.in** देखील प्रसिद्ध करण्यात येत आहे.

पुणे :
दिनांक १४ नोव्हेंबर २०१९.

**नो. र. शेन्डे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २१२.

## BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.—

No. DTP-Pardi, Bharatwada, Punapur and Bhandewadi Draft TPS No. I Nagpur /ADV-poss/ Sec. 83(*2*) TPV-2-5502-2019.—

Whereas, the Pardi, Bharatwada, Punapur and Bhandewadi Draft Town Planning Scheme No. I, Nagpur (hereinafter referred to as the " said draft scheme ") as submitted by the Nagpur Improvement Trust (hereinafter referred to as the " said Planning Authority ") *vide* its letter dated 06th July 2018, has been sanctioned by the State Government, *vide* Notification No. TPS-2418-Nag.Camp-9-CR-281/2018-UD-9, dated 06th October 2018 under sub-section (*2*) of Section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as the " said Act ") ;

And whereas, the State Government *vide* Notification No. TPS-2411-Nag.Camp-9-CR-281/2018-UD-9, dated 15th November 2018 issued under sub-section (*1*) of Section 72 of the said Act, read with the Maharashtra Town Planning Scheme Rules, 1974 has appointed the Assistant Director of Town Planning, Nagpur Branch as the Arbitrator (hereinafter referred to as the " said Arbitrator ") in respect of the said draft Scheme ;

And whereas, the Resolution No. 1/1169, dated 20th May 2017 has been passed by the said Planning Authority to authorize Nagpur Municipal Corporation and Nagpur Smart & Sustainable City Development Corporation Ltd. (NSSCDCL) as Special Purpose Vehicle (hereinafter referred to as the " said Special Purpose Vehicle-SPV ") to prepare the said draft scheme ;

And whereas, in the said draft scheme, the lands bearing various Final Plot Nos. (which are without any buildings) reserved for EWS Housing as Reservation No. 323, 327, 396 and 382 and shown in red lines on the Plan and kept open for the inspection by the public in office of the said Planning Authority ;

And whereas, on the request of said SPV, the said Planning Authority *vide* Resolution No. 12/1183-26-11-2018-SE-Planning dated 26th November 2018, has resolved that, in the interest of the public it is necessary to take the advance possession to undertake forthwith the execution of works included in the said draft scheme, for EWS Housing as mentioned above and shown on the said scheme plan;

And whereas, the said Planning Authority has on 05th January 2019 made an application to the Arbitrator, duly appointed in respect of the said scheme, that to submit the proposal of advance possession to Government as required by sub-section (*1*) of Section 83 of the said Act, to vest in it the lands reserved for EWS Housing as shown in the said draft scheme ;

And whereas, the Arbitrator, after hearing the persons affected, as required by the proviso to sub-section (*2*) of Section 83 of the said Act, submitted his report to the State Government on 23rd July 2019 along with the proposal of advance possession ;

And whereas, the Government *vide* Notification No. TPS-1813-3211-CR-508-UD-13, dated 01st December 2016 has delegated the powers exercisable by it, under sub-section (*2*) of Section 83 of the said Act, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune. Accordingly the Government forwarded the above proposal of advance possession of Director of Town Planning, Maharashtra State, Pune for further action on 06th August 2019 ;

And whereas, the Arbitrator mentioned in his report that it is not suitable to take advance possession of lands under Reservation No. 327, 396 and 382 EWS Housing, as these lands are regularised under Maharashtra Gunthewari Act by the said Planning Authority. Therefore, lands under these Reservation No. 327, 396 and 382 EWS Housing are not consider for advance possession ;

And whereas, Arbitrator also mentioned that the landowner of land under Reservation No. 323, EWS Housing requested to shift Reservation No. 323 in their family's and nearby. Accordingly, the Arbitrator communicated this fact to the said Planning Authority *i.e.* NIT and recommended for advance possession ;

And whereas, in the sanctioned Revised Development Plan of Nagpur City the lands covered by the said draft scheme are included in Residential, Industrial, Commercial, No Development Zone and Reservations. The said Planning Authority has resolved that the above land uses and reservations are to be deleted and included in the said draft scheme. Accordingly, after following all legal procedures as per provisions of sub-section (*1*) of Section 37 of the said Act, submitted a modification proposal to the Government for its sanction;

And whereas, under sub-section (*2*) of Section 37 of the said Act the Government sanctioned the above modification proposal *vide* Notification No. TPS-2418-1704-CR-293-2018-UD-9, dated 14th November 2018 and for that purpose amends the Development Plan as follows—

> "The lands from Green belt control scheme of Nagpur Improvement Trust admeasuring 1730 Acre (700.404 Hectare) from mouje Pardi, Bharatwada, Punapur and Bhandewadi which are included in the Central Government Smart City Mission, are deleted from proposed reservations and land uses in the sanctioned Development Plan proposals and included in land uses as per Draft Town Planning Scheme No. I as shown on the plan, subject to the condition specified below. "—

*Condition:*–Proposal on the lands from mouze Pardi, Bharatwada, Punapur and Bhandewadi as per Draft Town Planning Scheme No. I sanctioned under Section 68(*2*) by the Government shall become part of the sanctioned Development Plan.

And whereas, the Government *vide* Notification No. TPS-2419-1419-CR-154-2019-UD-9, dated 27th August 2019 permits the Nagpur Municipal Corporation to exercise the powers of Planning Authority under the said Act in the entire area under its jurisdiction including the area covered by the Seven Scheme of the Nagpur Improvement Trust and NIT will cease to exercise the powers of a Planning Authority under the said Act ;

And whereas, as per Government Notification dated 14th November 2018 the said draft scheme shall become part of the sanctioned Development Plan. Therefore, as per sanction Development Control Regulation No. 13.5 the Authority may shift the reservation in Development Plan. And whereas, as per the Government Notification dated 27-08-2019 the Nagpur Municipal Corporation is the Planning Authority for said Draft Scheme and in that capacity the Commissioner, Nagpur Municipal Corporation has shifted the Reservation No 323, EWS Housing area 27523.0 sq. mtr. from Final Plot No. 323 to Final Plot No. 66/1 and 66/2 *vide* their Order No. 556, dated 25th September 2019 ;

And whereas, Commissioner, Nagpur Municipal Corporation has accordingly submitted the copy of order dated 25th September 2019 along with copy of part plan thereof, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune. Therefore, Reservation No. 323, EWS Housing area 27523.0 sq. mtr. bearing CTS No. 148, Original Plot No. 66, Final Plot No. 66/1 & 66/2 ( hereinafter referred to as the " said Land " ) is now become the proposal of the said draft scheme. Hence, said land can be considered for advance possession under sub-section (*1*) of Section 83 of the said Act ;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune after considering the report of the Arbitrator, is satisfied that it is urgently necessary in the public interest to empower the Nagpur Municipal Corporation being the Planning Authority to enter on the said lands, and for that purpose take advance possession of the said lands urgently thereof, for execution of the said EWS Housing works as proposed in the said draft scheme.

Now, therefore, in exercise of the powers delegated to him, under sub-section (*2*) of the Section 83 of the said Act, and all other powers enabling in this behalf, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune hereby directs the Arbitrator to take advance possession of the said lands mentioned in the Schedule appended hereto and take further necessary action as would be necessary in this regard.

SCHEDULE

| Sr. No. | CTS No. | Original Plot No. | Final Plot No. | Area under advance possession for Reservation No. 323, EWS Housing |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1 | 148 | 66 | 66/1 (Part) & 66/2 | 27,523.00 sq. mtr. |

*Note :*–Plan showing the above lands is kept open for inspection by the public during office hours on all working days in the office of—

(1) The Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur.

(2) The Chairman, Nagpur Improvement Trust, Nagpur.

(3) The Arbitrator, Town Planning Scheme No. I, Nagpur.

This Notification shall also be published on the Directorate websit *www.dtp.maharashtra.gov.in.*

N. R. SHENDE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 14th November 2019.

ना.-एक-अ-२ (१७०६).

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २१३.

## मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून

**वाचा :—** (१) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक १३ मार्च २०१२ नुसार झालेली सुधारणा.

(२) नगर परिषद सर्वसाधारण सभा, दिनांक २४-११-२०१४, ठराव क्र. ६.

### आदेश

क्रमांक वशि-प्रशासन-४१६-२०१९.—

नगर परिषद, वरोराचा कारभार महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ नुसार चालतो व ज्याअर्थी, नगर परिषद, वरोरा करिता ' ब ' वर्ग नगर परिषदेसाठी लागू असलेली प्रमाणित विकास नियंत्रण नियमावली लागू आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त वाचा मध्ये नमूद क्र. (१) व (२) नुसार नगर परिषद, वरोराच्या सरहद्दीत अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणावर नियंत्रण ठेवण्याकरिता पदनिर्देशित अधिकारी नियुक्ती करण्याचे शासनाचे निर्देश आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनधिकृत व अतिक्रमणावर प्रभावी नियंत्रणासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५५ मध्ये असणा-या तरतुदी लागू आहेत.

त्याअर्थी, मी, सुनिल दाजीबा बल्लाळ, मुख्याधिकारी, नगर परिषद, वरोरा, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलमे १७७, १७९, १८०, १८१, १८२, १८७, १८८, १८९ (८), १९५, १९९(१), (२) व २१० मध्ये नमूद कारणाकरिता तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ ची कलमे ५२, ५३, ५४ व ५५ करिता नगर परिषद, वरोरा हद्दीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याकरीता उपरोक्त नमूद कायद्यातील कलमाच्या अंमलबजावणीकरिता खालील अनुसूचित नमूद अधिका-याची पदनिर्देशित अधिकारी म्हणून घोषणा करीत आहे.

### अनुसूची

| अनुक्रमांक | अधिका-याचे नाव | हुद्दा | सोपविण्यात आलेले कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्री. अक्षय सु. खैरनार | रचना सहाय्यक श्रेणी ब | न.प., वरोराचे हद्दीतील संपूर्ण कार्यक्षेत्र |

वेळोवेळी मुख्याधिकारी यांनी निर्गमित केलेल्या विवक्षित आदेशामध्ये नमूद केलेल्या कार्यक्षेत्रासाठी पदनिर्देशित अधिका-याच्या नियुक्तीच्या कालावधीत त्या पदावर कार्यरत असणा-या अधिका-याच्या कालावधीप्रमाणे त्या अधिका-यास पदनिर्देशित अधिकारी समजण्यात येईल.

या आदेशाद्वारे पदनिर्देशित झालेल्या अधिका-याने शासन निर्णय क्रमांक कंडोमपा-१००६-प्र.क्र. १९२-२००६-नवि-२८, दिनांक २ मार्च २००९ नुसार व नगर परिषद सर्वसाधारण सभा दिनांक २४-११-२०१४, ठराव क्र. ६ नुसार निश्चित झालेल्या प्रशासकीय संयंत्रणेचे सहकार्य घ्यावे.

उपरोक्त आदेश हा महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-४, दिनांक १३ मार्च २०१२ अन्वये कायद्यात झालेल्या सुधारणेनुसार व नगर परिषद सर्वसाधारण सभा दिनांक २४-११-२०१४, ठराव क्र. ६ चे अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

हा आदेश तात्काळ प्रभावाने लागू होईल.

वरोरा :
दिनांक १९ नोव्हेंबर २०१९.

**सुनिल बल्लाळ,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वरोरा.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकाला प्रसिद्ध झालेली आहे.**

५३

**सोमवार, नोव्हेंबर १८, २०१९/कार्तिक २७, शके १९४१**

भाग १ -अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६६.

**आयुक्त, महानगरपालिका, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) नुसार विकास नियंत्रण नियमावली - २००० मधील फेरबदल**

क्रमांक -मनपाना-नरवि-कलम-३७(१)-११३४-२०१९.—

नागपूर शहराची सुधारित विकास योजना, (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधले आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६, ( सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) ( यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे ) चे कलम ३१ (१) अन्वये शासन, नगर विकास विभाग अधिसूचना क्र टिपीएस- २४९६-२६४३-प्र.क्र ३०० (अ) -९७-नवि-९, दिनांक ०७ जानेवारी २०००, अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक ०१ मार्च २००० पासून अंमलात आली आहे, तसेच नागपूर शहराची सुधारीत विकास योजना विकास नियंत्रण नियमावली शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र टिपीएस- २४००-१६८४-प्र.क्र. २३५-२०१४-नवि-९, दिनांक ३१ मार्च २००१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक ०९ एप्रिल २००१ पासून अंमलात आली आहे व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी सुधारणा केलेल्या आहेत (यापुढे " उक्त विकास नियंत्रण नियमावली " असे संबोधले आहे.)

उक्त विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विनियम क्र. एन. २.९(३) मध्ये शासकीय/निमशासकीय आणि सार्वजनिक क्षेत्राअंतर्गत कार्यालयासाठी अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्याबाबतची तरतुद आहे. राज्यातील इतर महानगरपालिका क्षेत्रासाठी शासकीय/निमशासकीय आणि सार्वजनिक क्षेत्राअंतर्गत कार्यालयासाठी अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची तरतुद करण्यात आलेल्या आहेत. या तरतुदीशी सुसंगत तरतूद नागपूर महानगरपालिका क्षेत्रासाठीच्या विद्यमान तरतुदीमध्ये सुधारण करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे. आणि या उद्देशासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये नागपूर महानगरपालिकेस दिलेल्या निर्देशानुसार ( शासन निर्णय क्र. टिपीएस- २४१८-७०४-प्र.क्र ४०-२०१९-नवि-९, दिनांक ८ मार्च २०१९) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये खालीलप्रमाणे नागपूर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत फेरबदल प्रस्तावित करण्यात येत आहे.

**N-2.9(3) Building of Government and Semi-Government Offices and Public Sector under taking in non-congested area**

| Categories of the other buildings | Basic FSI | Additional FSI | Rate of the Premium | Conditions if any |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| Buildings of Government and Semi/Government Offices and Public Sector Undertakings | As per Regulation No. N-2.9(6) | Maximum building potential limit as per road width as mentioned in Regulation No. N-2.9(6) Column 7/8 of Table minus Basic FSI | No Premium for building of Government and Semi/Govt. Offices, Local authorities. For public sector buildings premium equal to 30% | (i) The Municipal Commisioner/Chairman, Nagpur Improvement Trust may allow the additional FSI.<br>(ii) Minimum and maximum height shall be 3.60m. & 4.2 m. respectively. The greater height may be permitted by the Authority as per the requirement. |

सबब, मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये वरीलप्रमाणे फेरबदलची कार्यवाही करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेने ठराव क्र. ४३७/वि.क्र. ३५६, दि. २२ ऑगस्ट २०१९ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावित फेरबदलाची संपूर्ण सूचना सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, महानगरपालिका, नागपूर श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत 'बी' व 'सी' विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१ या कार्यालयात कामकाजाचे सर्व दिवशी कामकाजाचे वेळात जनतेच्या निरिक्षणासाठी उपलब्ध राहील. तरी नागरीकांना सूचित करण्यात येते की, ही सूचना शासनाचे **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून १ महिन्याचे कालावधीत नागपूर शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली, २००० मध्ये उपरोक्त प्रस्तावित फेरबदलाच्या संबंधात ज्या सूचना किंवा हरकती महानगरपालिकेकडे प्राप्त होतील. त्यावर योग्य तो निर्णय घेऊन प्रस्तावित फेरबदलाचा प्रस्ताव मंजुरीस्तव शासनास सादर करण्यात येईल.

**अभिजीत बांगर,**
आयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

नागपूर :
दिनांक १६ नोव्हेंबर २०१९.

---

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६७.

BY COMMISSIONER, MUNICIPAL CORPORATION

**Modification under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. NMC-TPD-ACT-37-1134-2019.—

Whereas, the Development control Regulations of Nagpur Municipal Corporation has been sanctioned by the Government *vide* Urban Development Notification No. TPS-2400-1684-CR-192-2000-UD-9, dated the 31st March, 2001 under Section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 and have come into force with effect from the 9th April, 2001. Also Nagpur Municipal Corporation has been declared as 'Planning Authority' for Nagpur City excluding seven schemes which are retained with Nagpur Improvement Trust, Nagpur *vide* Govt. Notification No.TPS-2401-855-CR-76-UD-9, Dt. 27th February, 2002.

In view of the above General Body of Nagpur Municipal Corporation has passed Resolution No. 437/356 in the General Body Meeting held on dated 22nd August 2019 proposed modification the following provision of Development Control Regulations of Nagpur City. Under section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act 1966.

Where as in the provision No. 2.9(3) of the said Development Control Regulations there is a provision regarding the additional FSI for the Building of Government and Semi-Government offices and public sector undertaking. In the other Municipal Corporation of the state the provision for allowing the additional FSI has been incorporated for the Building of Government and Semi-Government offices and public sector undertaking. Therefore the Government is of opnion that a provision consistant with this provision in other Municipal Corporation in this state is necessary to incorporate in the said provision of DCR Nagpur, for this purpose Government has given the direction U/s 154 of the MR & TP Act 1966 to the NMC *vide* Notification No. TPS-2418-704-CR-40-2019-UD-9, dated 8th March, 2019. As per the said Govt. directions the following modifications are proposed by the Nagpur Municipal Corporation.

**N-2.9(3) Building of Government and Semi-Government Offices and Public Sector under taking in non-congested area**

| Categories of the Other Buildings | Basic FSI | Additional FSI | Rate of the Premium | Conditions if any |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| Buildings of Government and Semi/Government Offices and Public Sector Undertakings | As per Regulation No. N-2.9(6) | Maximum building potential limit as per road width as mentioned in Regulation No. N-2.9(6) Column 7/8 of Table minus Basic FSI | No Premium for building of Governmet and Semi/Govt. Offices, Local authorities. For public sector buildings premium equal to 30% | (i) The Municipal Commisioner/Chairman, Nagpur Improvement Trust may allow the additional FSI.<br>(ii) Minimum and maximum height shall be 3.60m. & 4.2 m. respectively. The greater height may be permitted by the Authority as per the requirement. |

Therefore as per NMC's General Body Resolution No. 437-356, Date 22nd August 2019 it is decided to make above modification in sanctioned Development Control Regulations- 2000 for Nagpur City, under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

The details regarding aforesaid proposed modification are available at the office of Town Planning Deptt., Nagpur Municipal Corporation, 3rd floor, Administrative Bulding, Nagpur Municipal Corporation, Civil Lines, NMC Road, Nagpur-440 001 for inspection by public during office hours on all working days. The Suggestions and objections which may be received by the Municipal Corporation in respect of the said modifications within a period of 1 month from the date of publication of this notice in the Official Govt. *Gazette* will be considered by the Commissioner, Nagpur, Municipal Corporation, Nagpur before submitting the said proposed modification proposal to the Govt. for sanction.

Nagpur:
Dated the 16th November 2019.

ABHIJIT BANGAR,
Commissioner,
Nagpur Municipal Corporation,
Nagpur.

ना.-एक-अ-३ (१७०६).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.